चारुलता विसपुते



# हे विश्वचि माझे घर

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

एक अंकी धमाल शैक्षणिक बालनाट्य

# हे विश्वचि माझे घर

## लेखिका : चारुलता गुलाब विसपुते

# हे विश्वचि माझे घर

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फुकट नाही

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.
## साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

हे विश्वचि माझे घर

लेखिका :चारुलता विसपुते

c/o मेजर परशुराम शिंदे.

A/1 शाहू महाराज सोसायटी,

N/7 सिडको , औरंगाबाद

मोबाईल नंबर:- 9272592925

Email - visputecg@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : १० जानेवारी २०१९

©esahity Pratishthan®2019

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

चारुलता गुलाब विसपुते.



🌷माझे आवडते लेखक माननीय वि. वा. शिरवाडकर हे होय. आपण त्यांचा जन्मदिवस [ २७ फेब्रुवारी ] "मराठी भाषा गौरव दिन" म्हणून साजरा करत असतो. माझे सर्वाधिक आवडते पुस्तक म्हणजे नटसम्राट हे होय.

🌷 माझे वाचन हे साहित्यकृतीतील प्रत्येक कलाकृती मी वाचत असते. मला कथा ,कादंबरी, लघुकथा, नाटक, कविता वाचायला विशेष आवडत असतात.

🌷माझे प्रेरणादायी व्यक्तिमत्व म्हणजे "EON Vertex" चे प्रमुख माननीय प्रमुख संचालक माननीय श्री. रमण बिडवे सर हे होय.

कायमस्वरूपी पत्ता:- चारुलता गुलाब विसपुते. एन 53, एस् एफ 4\12\8, उत्तम नगर ,सिडको , नाशिक.

सध्याचा पत्ता:- c/o मेजर परशुराम शिंदे. A/1 शाहू महाराज सोसायटी,N/7 सिडको , औरंगाबाद

🌷 मोबाईल नंबर:- 9272592925

: अर्पणपत्रिका :

॥ जन्म घेउनी कृतार्थ झाले ॥

आज मी या जीवना ॥

आशीर्वादाचा वरदहस्त ॥

तुमची माया, प्रेम ॥

अखंड राहू दे ॥

जन्मोजन्मा ॥



माझ्यावर नितांत प्रेम करणारे माझे आई पप्पा.🙏

भिका त्र्यंबक सोनार (मोरे)

मनोरमा भिका सोनार (मोरे)

माझी पहिली कलाकृती आपल्याला अर्पण करते.

: मनोगत:

"हे विश्वचि माझे घर" निसर्गाशी जवळीक साधणारे गंमतीदार बालनाटक आहे. आंतरराष्ट्रीय विश्व पर्यावरण दिन आपण पाच जून रोजी साजरा करत असतो. पर्यावरणाचे रक्षण करणे सर्वांची जबाबदारी आहे. यासाठी वृक्षारोपण करणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे. पाण्याचे महत्व सांगणारे असे हे बालनाट्य आहे. आणि निसर्ग हा आपल्यापुरताच मर्यादित नसून संपूर्ण विश्वाचा आहे. पर्यायाने हे संपूर्ण विश्व आपले आहे. या विचाराने या नाटकाचे नाव देण्यात आले आहे मी फार मोठी लेखिका नाही. वयाची काही वर्षे शिक्षकीपेशा स्वीकारल्यामुळे लहान मुलांच्या संपर्कात होते. लहान मुलांवर मुलांवर प्रेम, माया, जिव्हाळा आहे. मुलांसाठी काहीतरी लिहावे असे वाटले. आणि या संकल्पनेतूनच माझे हे पहिले बालनाट्य आपणा समोर आले आहे. त्यामुळे लेखनात काही त्रुटी असतील. पण बालमित्रांनो लेखनाचा उद्देश नक्कीच लक्षात घ्यावा. "आकाशवाणी केंद्र औरंगाबाद" च्या माध्यमातून लेखनशैलीला खरी सुरुवात झाली सर्वप्रथम आकाशवाणी भगिनी मंडळाच्या संचालिका नम्रता फलके मॅडम यांनी आयोजित "गोष्ट ज्ञानासाठी" या विषयावर माझी शालिनी संतोष केचे हिने घेतलेली मुलाखत आहे घेतली.

त्यानंतर आकाशवाणी केंद्र औरंगाबाद भगिनी मंडळच्या माध्यमातून "कस्तुरबा गांधी यांचे जीवन आणि कार्य" आणि "आमचे आदर्श महाराणा प्रताप" यांची यांची विषयी भाषण झाले. त्याच प्रमाणे भगिनी मंडळ 'हॅलो सई' फोनिंग

कार्यक्रमातून प्रत्येक नवनवीन विषयांवर आपले विचार मांडण्याची मला संधी मिळत गेली. आणि आज ह्या "हे विश्वचि माझे घर" या बालनाट्यातून संपूर्ण विश्वाशी जवळीक साधण्याचा प्रयत्न करत आहे. यात माझे काव्यलेखन आले आहे. हसत खेळत नाचत-गात हे बालनाट्य उभे राहिले आहे. माझे प्रेरणादायी व्यक्तिमत्व असलेले "EON Vertex" चे प्रमुख संचालक माननीय श्री. रमण बिडवे सर यांच्या " You can do it ma'am. Be Confident " ह्या वाक्याने माझ्यात आत्मविश्वास निर्माण झाला. आणि तो माझ्या बालनाट्यांतून प्रगट झाला. लेखनाचा आशय आपण नक्कीच समजून घ्याल अशी मी आशा करते.

आपली

चारुलता विसपुते.

~~~~~~~~~~~~~~~~~~
~~~~~~~~~~~~~~~~~~

🌍 "हे विश्वचि माझे घर"🌍

लेखिका 🖊️

चारुलता गुलाब विसपुते.

[ आकाशवाणी रेडिओवरील गाणे चालु आहे. ]

फुलपाखरं. ..

फुलपाखरं आली धरणीवर..

रविवारची सुट्टी घालवू या..

घडीभर गंमत करू..

या घडीभर गंमत करू।।धृ।।

आम्ही अप्सरा इंद्राघरच्या...

तारका ह्या निळया अंबरीच्या...

कधी इथे कधी तिथे..

जाऊ आम्ही इथ तिथ...

हे विश्वचि आमचे घर ।।१।।

फुलपाखरं आली धरणीवर..

रविवारची सुट्टी घालवू. ..

या घडीभर गंमत करू...

या घडीभर गंमत करू... ।।}

( हे गाणे म्युझिक चालु आहे आणि ओजस नाचत आहे. )

(मोठा भाऊ) अमोद दादा पुस्तक वाचत घरात बसलेला असतो. आणि (लहान भाऊ) ओजस उड्या मारत मारत प्रवेश करतो.

ओजस :- अमोद दादा ,अमोद दादा.

अमोद दादा :- काय म्हणतोस ओजस ?

ओजस :- अमोद दादा काय करतोस ? बाहेर बघ किती छान पाऊस येऊन गेला आहे.

अमोद दादा :- हो रे !! ओजस खूपच छान.

ओजस :- हो खूपच मस्त , छान वातावरण झाले आहे. चल आज आपण अंगणात मस्त खेळूया; मजा करूया; नाचू या; वाऱ्याबरोबर गाणे गाऊ या.

अमोद दादा :- ओजस, नको रे. नको !!!

ओजस :- असा रे काय दादा. रोज रोज फक्त अभ्यासच करतो.

अमोद दादा :- असं नाही ओजस.

मी विचार करत होतो या पर्यावरणाचा.

ओजस :- ( आश्चर्याने ) पर्यावरणाचा !!! म्हणजे रे काय दादा ?

अमोद दादा :- ओजस, आज आहे पाच जून.. विश्व पर्यावरण दिन.

आज शाळेत मला पर्यावरणाची खूप खूप माहिती सांगितली आमच्या शिक्षकांनी..

आणि संदेश दिला, ईको दिवसाचा.

"पर्यावरण वाचवा वसुंधरा फुलवा"

मी तुला छान गोष्ट सांगू का ?

ओजस :- अरे वा !!! गोष्ट ; गोष्ट मला खुप खुप आवडते. मजाच मजा.

अमोद दादा :- चल तर मग ; आज तुला छान वर्षा ऋतुची म्हणजेच पावसाची गोष्ट सांगतो.

(आणि दोघेही गोष्टीत रममाण होतात. )

[पडद्यामागून कोणी तरी बोलण्याचा आवाज येतो. बोलण्याचे शब्द फक्त ऐकायला येतात. ]

माझ्या बालमित्रांनो ,. .. आपण रिमझिम पडणाऱ्या पावसाची आतुरतेने वाट पाहत असतो.

सळसळणारा वारा ,विजेचा लखलखाट आणि मेघांचा गडगडाट वातावरणात एक सुखद गारवा आणि वेगळीच धुंद घेऊन येतो.

सगळीकडे कसं नवचैतन्याची उधळण होत असते. दरवळणारा मृद्गंध मनाला मोहून टाकतो. सगळी सृष्टी या पावसाचे म्हणजेच वर्षाचे स्वागत करत असते. त्यांच्या वर्षवात चिंब होत असते. पण खूप खूप वर्षांपूर्वी ह्या नाटकाच्या काळात असं काहीच नव्हतं बर का शेवटी काय नाटकातला काळ तो काय. .. आणि त्याकाळी सागर म्हणजे समुद्र आणि अवंती म्हणजे पृथ्वी शेजारी शेजारी राहायचे. रवी म्हणजे आपला सूर्य खूप कुठेतरी लांब रहात असे. वारा नाही नाही ;पाऊस नाही ;पाणी नाही; धरती अगदी वैराण झाली होती. भेगा पडल्या होत्या तिला; झाड तर राहूद्या , एक गवताचं पातं देखील नव्हतं. असणार तरी कसं म्हणा' कारण त्याकाळी पाऊसच पडत नसे. पृथ्वीला म्हणजेच आपल्या अवंतीला त्याचं फार फार वाईट व असे. तिला हसणारी, खेळणारी, बागडणारी, नाचणारी हिरवीगार वनराई हवी होती. तर मग ही गंमत घडली कशी ऐका.. .. तर आमच्या ह्या नाटुकलीत. ..

नाटकाचा तात्पर्य लक्षात ठेवायचं हं !!!

नाटकाचं नाव आहे.

🌍"हे विश्वचि माझे घर" 🌍

सागर :- हे अवंती ताई ,लक्ष कुठे असतं तुझं ? अगदी खिन्न असते बघ.

कुठे जात येत नाहीत. अशी बसून रहाते. मी बघ कसा छान उड्या मारत मारत फिरत असतो. आणि तू मात्र वेडाबाई , नुसती कुठेतरी बघत बसून राहते.

काय होतं ते तरी सांग ? कोणी काही बोललं का ? कोणी काही त्रास दिला का ? सांग तरी मला.

अवंती :- नाही रे सागर दादा. मला कोण त्रास देणार. पण मी सारखा विचार करत असते.

तू सगळीकडे वहात का नाही जात. म्हणजे माझ्या सगळ्या मातीला पाणी मिळालं असतं.

सागर :- पण मी कसा वाहत जाणार ? तूच म्हणत नाही का , "सागराला किनाऱ्याचा बंधन असतं".

अवंती :- पण खरंच का सागर दादा हे बंधन नसतं तर किती छान झाले असते. कारण तू जरी माझ्या जवळ असला, तरी मला पाणी मिळालं नाही. तुझं पाणी मला मिळालं तर किती मजा येईल. माहिती आहे का ? माती आणि पाणी एकत्र आली की सगळीकडे आनंदी आनंद पसरेल.

सागर :- ते खरं , पण माझं सागराचे पाणी तुझ्या पर्यंत पोहोचणार कसं ?

मला काही सुचत नाही. आपण असं करू या का ?

आपण त्या पर्वत राजाला विचारू तो खूप हुशार आहे. तो आपल्याला नक्कीच काहीतरी उपाय सांगेल. चल जाऊ या.

(सागर आणि अवंती दोघेही पर्वत राजा कडे जातात. )

सागर आणि अवंती:- हे पर्वतराज दादा,

"उठणार का ? आमच्याशी बोलणार का ? आमचं एक कोडं तू सोडवणार का ?

पर्वत :- कोडं !!! लगेच , वाटत बघत असतो कोड्याची. कोडी मला खूपच आवडतात. बोला. काय तुमचा प्रश्न ? लगेच सांगतो उत्तर. बोला

अवंती :- मी आहे अवंती ; माझ्याजवळ भरपूर माती आहे. आणि हा आहे सागर दादा; याच्याजवळ भरपूर पाणी आहे.

पण हे पाणी आम्हाला मिळू शकत नाही. आम्हाला काहीतरी उपाय सांग ? सागराच पाणी मला मिळेल. सगळी माती भिजेल अशी काही तरी जादु कर.

पर्वत :- जादू !!! जादू कशाला ? अग युक्ती करायची.

सागर :- जादू म्हणजे युक्ती असते ; हो की नाही ?

अवंती :- तेच ते. काहीतरी युक्ती सांग. लवकर सांग. सांग ना रे , लवकर..

पर्वत :- सांगतो ; तुम्ही सूर्य म्हणजेच रवीला ओळखतात का ? त्याच्याकडे जा. त्याला मैत्री करायला आवडते. तो खुश होईल ; तुम्हाला बघून.

त्याला सांगा , आमच्या जवळ राहायला ये. पण जपून , त्याला खूप जवळ बोलवू नका.

सागर :- हो ,हो , पण त्याच्यामुळे आम्ही तर भाजूनच निघू. तो जवळ आला की आवंतीला कसं पाणी मिळेल ?

पर्वत :- सूर्याच्या उष्णतेने पाण्याची वाफ होऊन ती आकाशात वर वर जाईल. आणि मग तिला पाणी मिळेल.

सागर आणि अवंती :- थँक्स दादा. आता आम्ही जातो. धावत धावत जाऊन सूर्याला म्हणजेच रवीला गाठतो.

[ सागर आणि अवंती दोघे सूर्याकडे जातात. ]

सागर आणि अवंती :- सूर्यनारायणा, सूर्यनारायण. रवी , भास्करा, दिनकरा आम्ही तुझ्याकडे एका कामासाठी आलो आहोत. तू आमचा मित्र, सखा होशील का ?

रवी :- हे काय विचारायला हवं का ? मला मैत्री करायला खुप आवडते. म्हणूनच तर मला सगळे मित्र म्हणतात.

तुम्हाला पाहून मला खूप आनंद झाला आहे.

अवंती :- मग सांग ना तू आमच्या जवळ राहायला येशील का ?

रवी :- येईल ; पण त्यामुळे तुमचा असा काय फायदा होणार ?

सागर :- तू आमच्या जवळ आला की, तुझ्या उष्णतेने माझ्या पाण्याची वाफ होईल. ती उडवून आकाशात जाईल. आणि ते पाणी अवंती ला मिळेल.

रवी :- फारच छान !! फारच छान !!!

ही गंमत तर मला आवडली बुवा. मग कधी येऊ मी राहायला.

सागर :- लगेच..

[काही दिवसानंतर ]

सागर :- अवंती ताई ; आता काय करायचं ?

आपण रवीला बोलावलं. तो आला ; पण माझ्या पाण्याची वाफ होते. आणि ती आकाशात जाऊन थांबते.

माझ्या आणि ह्या रवी मध्ये ढग अडकून बसल्यामुळे इतर पाण्याची वाफ होण पण थांबलय. आणि तुला पाणी मिळत नाही ते नाहीच..

अवंती :- मला वाटतं आपण परत पर्वत राजाकडे जावं. जाऊ या का ?

सागर :- हो हो चल.

[अवंती आणि सागर पर्वत राजा कडे जातात. ]

पर्वत :- काय रे सागर ; काय ग अवंती. पुन्हा आलात.. ... तुमच्या प्रश्नाचं उत्तर कुठे चुकलंय का ?

सागर :- तसं नाही रे , पर्वत राजा उत्तर नाही चुकलं. तू सांगितलं अगदी तसंच झाल.

रवी आमच्याकडे राहायला आला. माझ्या पाण्याची वाफ झाली ती वर आकाशात गेली. पण, पण माझ्याच वर बरं का !!!

जमिनीचा जो भाग आहे ना तिथे वाफ जातच नाही आणि पाऊस पडतच नाही मग आता रे काय करायचं ?

अवंती :- सांगशील का अजून काही जादू ?

सागर :- जादू नाही ग युक्ती..

. अवंती :- तेच रे , सांग की अजून एक युक्ती..

पर्वत :- लगेच सांगतो ; तुम्ही असे करा वाऱ्या कडे जा. त्याला तुमच्या जवळ बोलवा. तो आल्या की सागरा वरच्या ढगाला उडवीन आणि जमिनीवर पसरविन.

सागर :- खरंच की ,

आम्हाला कसं नाही सुचल ? चल ग, आपण वाऱ्या कडे जाऊ या.

[सागर आणि अवंती वाऱ्या कडे म्हणजे पवन कडे जातात. ]

पवन :- अरे ! अरे ! अरे !!! अशा इतक्या लगबगीने कुठे निघालात ?

सागर :- तुझ्याकडे रे. पवनराज तुझ्याच कडे.

अवंती :- आमचं की नाही , तुझ्याकडे काम आहे. तू आमच्या शेजारी रहायला येशील का ?

पवन :- बापरे शेजारी ; कारण न सांगता शेजारी कसं ?

सागर :- सांगतो ; सांगतो ; माझ्याकडे जे पाणी आहे ,ते ह्या अवंतीला हवं आहे. ते मी उचलून कसा देणार ?

अवंती :- म्हणूनच आम्ही सुर्याला आमच्या जवळ बोलावलं. त्याच्या उष्णतेमुळे पाण्याचे ढग झाले. पण ते उडून जमिनीच्या भागाकडे जात नाही. तू जर आमच्याकडे आलास तर दोघांना अडवून सगळीकडे पसरवू शकशील. आणि मग ,मग पाऊस पडेल आणि मला पाणी मिळेल. येशील ना तू आमच्याकडे राहायला ?

पवन :- येतो की.

अवंती :- चल मग जाऊया तर मग.

[काही दिवसानंतर ]

अवंती :- हे सागरदादा असा उदास नको बसू.

सागर :- मग कसं हसू ? ढग तुझ्या पर्यंत पोहोचले पण पाऊस पडत नाही. तुला पाणी मिळत नाही. काय करावं आता सांग.

अवंती :- आपण पुन्हा जाऊन पर्वतराजाला विचारू.

सागर :- पण तो तरी काय सांगणार ?

अवंती :- सांगेल सांगेल काही तरी. तो किती तरी हुशार आहे. हो कि नाही.

सागर :- बरं चल बघु तरी.

[सागर आणि अवंती दोघे परत राजा कडे जातात. ]

सागर आणि अवंती :- ए पर्वत राजदादा अजून आमचा प्रश्न सुटलाच नाही रे.

पर्वत :- आता काय झालं बरं ! वाऱ्यामुळे सगळे ढग उडवून तुझ्याकडे येतात ना ?

अवंती :- येतात पण सैरावैरा पळत पळत असतात. पाऊस पडत नाही ; का बरं, का पडत नाही रे ? का बर पडत नाही.

पर्वत:- ( विचारामध्ये ) खरंच का पडत नाही. थांब मला जरा विचार करू दे.

[ पर्वत राज विचार करत असतो. ]

हं ! आल लक्षात.

अरे ! ते ढग थंड व्हायला हवे ना. ..

अवंती :- मग आता काय करायचं ?

पर्वत :- आता तूच हे काम करायला हवे.

तू मोठे मोठे डोंगर तयार करून त्यावर मोठी मोठी झाडे उगव. वाढत्या मोठ्या झाडांमुळे ढग सुसाट पळायचे तर थांबतीलच. आणि थंड होतील.

आणि मग ,मग पाऊस पडेल.

अवंती :- पण खरंच पाऊस पडेल ना ?

पर्वत :- हो नक्की पडेल. लक्षात ठेवा.

मोठी झाडे नसतील , तर पाऊस पडणार नाही. पण जर मोठी मोठी झाडे असतील.

तिथे पाऊस पडेल. आणि पाऊस पडला की सगळी माती भिजेल. आणि अजून खूप झाडे उगवतील.

सगळं वातावरण हिरवागर्द होईल ; पण हे सर्व डोंगरमाथ्यावरून मोठी मोठी झाडे आहेत तोपर्यंत.

सागर :- समजले का अवंतीताई...

अवंती :- हो समजले सागर दादा.

[काही दिवसानंतर]

सागर :- अरे वा ! किती ,किती छान ,माझी अवंती ताई. .. किती हिरवीगार चैतन्य नटलेली दिसते. ते बघ आकाशात सुंदर इंद्रधनुष्य दिसते आहे.

अवंती :- हो रे सागर दादा , खूपच सुंदर आहे इंद्रधनुष्य.. रवीने आपली सप्तरंगी किरणे पावसाच्या थेंबावर आणि तयार झाले , सुंदर सप्तरंगी इंद्रधनुष्य..

सागर :- हो ग अवंती ताई. ता. ना. पि. हि. नि. पा. जा.

तांबड्या , नारंगी ,पिवळा ,.. .. हिरवा , निळा , पांढरा आणि जांभळा.. ..
सप्तरंगाचा गोफ विणला आहे.

अवंती :- तर मी खूप, खूप.. , खूप. .. आनंदी आहे. चला आज आपण सगळे नाचू - गाऊ या.

[गाणे म्हणत सगळे म्हणजे सागरदादा , अवंती ताई , पर्वत , रवी , पवन नाचू लागतात. ]

🌷गाणे🌷

🎤🎹🎹🎸

आजच आहे विश्व पर्यावरण दिन,.. .. ।।

नाचू गाऊ या.. नाचू गाऊ या... ।।

आणि झाडे लावू या. झाडे लावू या.. .. ।।धृ।।

ता. ना. पि. हि. नि. पा. जा.

ता. ना. पि. हि. नि. पा. जा. ।।

इंद्रधनुष्याची कमान... ।।

नाचू गाऊ या... नाचू गाऊ या.. ।।

आणि झाडे लावू या. झाडे लावू या... ।।१।।

"हे विश्वचि आपले घर"... ।।

आणि एकता आपले नाव ।।

ही सृष्टी सुजलाम-सुफलाम करूया. .. ।।

नाचू गाऊ या.. नाचू गाऊ या.. ।।

आणि झाडे लावू या झाडे लावू या... ।।२।।

सौरऊर्जेचा वापर करु या. .. ।।

पर्यावरणाची अवनती टाळू या. .. ।।

वायू जल आणि भूमीचे प्रदूषण टाळू या. .. ।।

नाचू गाऊ या , गाऊ या. .. ।।

आणि झाडे लावू या... झाडे लावू या.. ।।३।।

धरतीचा श्रृंगार आहे वृक्ष... ।।

जीवनाचा आधार आहे वृक्ष... ।।

वृक्षाचे पालकत्व घेऊ या... ।।

नाचू गाऊ या... नाचू गाऊ या.. ।।

आणि झाडे लावू या... झाडे लावू या.. .. ।४।।

विश्व पर्यावरण दिन साजरा करू या. .. ।।

साजरा करू या. .. ।।

इको डे साजरा करू या... ।।

नाचू गाऊ या नाचू गाऊ या. .. ।।

आणि झाडे लावू या... झाडे लावू या... ।।४।।

🀊 🌴🌳🌴🌳🌴

अमोद दादा :- काय मग ओजस.. कशी होती नाटुकली. आवडली की नाही ?

ओजस :- अरे वा !!! किती.. किती.. किती. .. छान होती पावसाची गोष्ट. विश्व पर्यावरणाचे गाणे.

आता मी पण खूप खूप झाडे लावणार आहे. आणि ती झाडे मोठी करणार आहे.

अमोद दादा :- पर्यावरणाचं रक्षण करणं सर्वांची जबाबदारी आहे. पर्यावरणाचे संरक्षण करणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. झाडे लावल्याने पर्यावरण रक्षण तर होतोच , पण निसर्ग साखळी आणि अन्नसाखळीचा विचार करून वृक्षारोपण आणि संवर्धन करणे गरजेचे आहे. कारण "हे विश्वचि माझे घर" आहे.

[ अमोद दादा आणि ओजस हातात हात घेऊन नाचत नाचत म्हणतात. ]

नाचू गाऊ या... नाचू गाऊ या. .. ।।

आणि झाडे लावू या... झाडे लावू या... ।।धृ।।

विश्व पर्यावरण दिन साजरा करू या. .. ।।

विश्व पर्यावरण दिन साजरा करु या ।।

इको डे साजरा करू या.. .. ।।

नाचू गाऊ या... नाचू गाऊ या. .. ।।

आणि झाडे लावू या. .. झाडे लावू या... ।।१।।

🌷समाप्त🌷